सत्यमेव जयते

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली

**E-mail** – nhmgadchiroli2020@gmail.com

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

---

## विशेष कंत्राटी पदभरती

जिल्हयातील करोना विषाणु (COVID-19) प्रादुर्भाव लक्षात घेवून उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे मनुष्यबळ आवश्यक आहे. त्याची पुर्वतयारी म्हणून जिल्हयातील आरोग्यसंस्था स्तरावर खालील शैक्षणिक व इतर अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून विहित नमुन्यात दिनांक ०४/०४/२०२० रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत nhmgadchiroli2020@gmail.com या ईमेल आयडीवर अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मुळ पदाचे नांव | अंतर्गत पद | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुपर स्पेशालीस्ट | कार्डीओलॉजीस्ट | १ | DM Cordiology | १,२५,०००/- |
| | | नेफ्रोलॉजीस्ट | १ | DM Nephrology | |
| २ | स्पेशालिस्ट | भुलतज्ञ | ७ | MD Anesthesia/ DA/ DNB | ७५,०००/- |
| | | स्त्रीरोगतज्ञ | ५ | MD/MS Gyn/ DGO/ DNB | |
| | | बालरोगतज्ञ | ७ | MD Pediatric/ DCH/ DNB | |
| ३ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) | वैद्यकिय अधिकारी | ९ | MBBS with registration of MMC | ६०,०००/- |
| ४ | वैद्यकिय अधिकारी (गट-ब) | वैद्यकिय अधिकारी (गट ब) | ४५ | BAMS with registration of MCIM | २८०००/- |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २० | B.Sc. | १७,०००/- |

| अ. क्र. | मुळ पदाचे नांव | अंतर्गत पद | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| ६ | **औषध निर्माण अधिकारी** | औषध निर्माण अधिकारी | २३ | B.Pharm / D.Pharm with Registration of Maharashtra State Pharmacy Council | १७,०००/- |
| ७ | **स्टॉफ नर्स** | स्टॉफ नर्स व एल.एच.व्ही. | ९२ | RGNM Course with Valid MNC Registration | २०,०००/- |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) सदरची पदे निव्वळ कंत्राटी/करार तत्वावरील असून राज्य शासनाची अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियानाची नाहीत. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक ३१/०५/२०२० पर्यंत किंवा करोना विषाणुचा प्रादुर्भाव नियंत्रणात येईपर्यंत, यापैकी जो कालावधी आधी येईल तोपर्यंतच्या कालावधीकरीता नियुक्ती दिली जाईल. त्यानंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

२) पदांसमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतीरीक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

३) पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

४) उमेदवारांनी ए-४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहित नमूण्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपूर्ण आवश्यक दस्ताऐवज स्कैन (Scan) करुन **दिनांक ०४/०४/२०२० रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत nhmgadchiroli2020@gmail.com** या ईमेल आयडीवरच सादर करावे. उमेदवारांनी ईमेल च्या विषयामध्ये **"Application for the post..........."** असे स्पष्ट नमुद करावे.

५) ईमेल द्वारे विहित कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांची माहिती संकलीत करुन पात्र उमेदवारांची त्यांच्या पात्रता परिक्षेतील अंतिम वर्षाच्या / सेमिस्टरच्या गुणावरुन गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्तेनूसार उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

६) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनूसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

७) सद्यस्थितीत जिल्हा सीमा बंद असल्याने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद असल्याने शक्यतो जिल्हयातीलच उमेदवारांनी अर्ज सादर करावे.

८) मुलाखत होणार नसल्याने तसेच अर्ज ईमेल द्वारेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये.

९) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहिल, याची दक्षता घ्यावी.

१०) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

११) सदर जाहिरात जिल्हा परिषद, गडचिरोलीचे www.zpgadchiroli.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असुन भरतीप्रकियेच्या पुढील सुचना सुद्धा वेळोवेळी संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांनी संकेतस्थळावर वेळच्या वेळी भेट द्यावी.

१२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनूसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे **दिनांक ०४/०४/२०२० रोजी** उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे राहील. परंतू वैद्यकिय अधिकारी (MBBS), स्पेशालिस्ट आणि सुपर स्पेशालिस्ट यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ७० वर्षे तसेच इतर पदांच्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी प्रमुख शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहिल.

१३) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या वेळी उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१४) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्य करण्यात येईल.

१५) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नमूना-अ** या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१६) उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१७) भरती प्रकियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्य करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे ईत्यादी सर्व अधिकार जिल्हा निवड समिती कडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी<br>गडचिरोली | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद गडचिरोली | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद गडचिरोली |

पासपोर्ट
साईझ फोटो
चिटकवावे

# करोना विषाणु उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी विशेष पदभरती
## अर्जाचा नमूना

................................ या पदाकरीता अर्ज

अर्जदाराचे पुर्ण नांव :...........................................................

पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :...........................................................
...........................................................
...........................................................

दुरध्वनी क्र./मोबाईल क्र. :........................ ई-मेल :........................

जन्मतारीख :...../...../.......... (शाळा सोडल्याच्या दाखल्यानूसार)
(दिनांक ०४/०४/२०२० रोजीचे वय) .........वर्षे.........महिने..........दिवस

अनूभव असल्यास पदाचे नाव :........................... कालावधी :.....वर्षे.....महिने
कार्यालयाचे नांव :...........................................................

**शैक्षणिक अर्हता –**

| पात्रता परिक्षेचे नांव | मंडळ/ विद्यापिठाचे नांव | अंतिम सेमिस्टर / वर्षाचे गुण | | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण गुण | मिळालेले गुण | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

इतर अर्हता : ...........................................................
...........................................................
...........................................................

उमेदवारांवर न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम कारवाई सुरु आहे काय ? असल्यास थोडक्यात विवरण ...........................................................
...........................................................

दिनांक :
स्थळ :

( )
उमेदवाराची स्वाक्षरी

**अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे (✓ अशी खुण करावी)**

| | |
|---|---|
| १) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | ६) अधिवास प्रमाणपत्र |
| २) SSC प्रमाणपत्र (Diploma) | ७) अनूभव प्रमाणपत्र |
| ३) शैक्षणिक अर्हता गुणपत्रीका | ८) |
| ४) नोंदणी प्रमाणपत्र | ९) |
| ५) संगणक प्रमाणपत्र | १०) |

# महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये

**प्रतिज्ञापन**
**नमूना-४**
**(नियम ४ पहा)**

मी श्री/श्रीमती/कुमारी ...................................................... श्री. ............................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी /पत्नी, वय ....... वर्षे, राहनार ..................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी .................................................. या पदाकरीता माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास जन्मतारीख नमूद करावी.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**(टिप : अविवाहित उमेदवारांनी “लागू नाही ” असे नमूद करुन स्वाक्षरी करावी.)**

ठिकाण :
दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी